कर्मचारीवर्ग खाते :
परिपत्रक क्र. २८ /१९९४

क्र. राप/आस्था/४२०-सीई/ ६५२०
म. रा. मा. प. महामंडळ, मध्यवर्ती कार्यालय,
महाराष्ट्र वाहतूक भवन, डॉ. आनंदराव नायर मार्ग,
मुंबई-४०० ००८. दिनांक ०५.१२.९५

प्रादेशिक व्यवस्थापक,
रा. प. मुंबई / पुणे / औरंगाबाद / नागपूर / नाशिक / अमरावती.

विभाग नियंत्रक,
राज्य परिवहन महामंडळ,
भांडार विभाग, कुर्ला, मुंबई/मुंबई/धुळे/जळगांव/नाशिक/पालघर/रायगड[पेण]/
रत्नागिरी/सिंधुदुर्ग/ठाणे/पुणे/अहमदनगर/कोल्हापूर/सांगली/सातारा/सोलापूर/
औरंगाबाद/बीड/जालना/लातूर/नांदेड/उस्मानाबाद/परभणी/नागपूर/अकोला/
अमरावती/भंडारा/बुलढाणा/चंद्रपूर/वर्धा/यवतमाळ.

विषय : आदिवासी क्षेत्रात काम करणाऱ्या अधिकारी/कर्मचारी यांना प्रोत्साहन भत्ता.

संदर्भ : कामगार करार दिनांक १.४.९२ ते ३१.३.९६
मागणी क्रमांक : २०.

---

1759
12/12/95

DPO

उपरोक्त कामगार करारात ठरल्याप्रमाणे महाराष्ट्र शासनाने निर्देशित केलेल्या आदिवासी क्षेत्रात काम करणाऱ्या अधिकारी/कर्मचारी यांना शासनाने निर्देशित केलेल्या दराने व नियमाप्रमाणे भत्ता देण्याचे मान्य केलेले आहे. त्यानुसार आदिवासी क्षेत्रात कार्यरत असणाऱ्या रा. प. अधिकारी/कर्मचारी यांना प्रोत्साहन भत्ता मंजूर करण्या-संबंधी खालील तत्वप्रणाली ठरविण्यात आली आहे.

१] आदिवासी उप योजना क्षेत्र म्हणून निर्धारीत केलेल्या राज्यातील ठाणे / रायगड / नाशिक / धुळे / जळगांव / अहमदनगर / पुणे / नांदेड / अमरावती / नागपूर / भंडारा / यवतमाळ / चंद्रपूर आणि गडचिरोली या १४ जिल्ह्यातील एकूण ६,९६२ गावे व १३ शहरे अशा एकूण ६,९७५ गांवात कार्यरत असलेल्या व तेथे मुख्यालय असलेल्या कार्यालयातील अधिकारी व कर्मचाऱ्यांना शासनाने निर्धारीत केलेल्या दराने दिनांक १.५.९२ पासून प्रोत्साहन भत्ता लागू करण्यात यावा व तो डिसेंबर-१९९४ पूर्वी अदा करण्यात यावा.

२] आदिवासी विकास विभाग, महाराष्ट्र शासन निर्णय क्रमांक आस्था/१०९३/ प्र.क्र.-२५१/का-१५, दिनांक २९.१२.१९९३ व शासन निर्णय क्रमांक आस्था/१०९३/ प्र.क्र.-२५१/का-१५, दिनांक २८.७.१९९४ नुसार प्रसारित केलेल्या शासन निर्णयाच्या प्रती ~~शासनाने निर्देशित केलेल्या ...~~ सोबत माहितीसाठी व कार्यालयीन उपयोगासाठी पाठवित आहे. तरी शासन निर्णयाप्रमाणे कार्यरत असलेल्या व तेथे मुख्यालय असलेल्या रा. प. कर्मचारी व अधिकाऱ्यांना तदरचा प्रोत्साहन भत्ता देण्याविषयी कार्यवाही करावी. याबाबतीत आपणांस काही संदर्भाची आवश्यकता भासल्यास आपल्या कार्यक्षेत्रातील नजिकच्या तहसील कार्यालय व जिल्हाधिकारी

...२